कोकणसाद
www.kokansad.com
सोमवार, दि. ८ ऑगस्ट २०२२

# हळबे महाविद्यालयाचा वर्धापनदिन उत्साहात

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग:** विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन खूप मोठे व्हावे, उच्च विद्याविभूषित होऊन आपली चांगली प्रगती करावी, मात्र त्याचबरोबर आपण ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतले त्या महाविद्यालयाची आठवण सदैव मनात बाळगून याच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना मदत करावी, असे आवाहन नवनिर्माण शिक्षण संस्थेचे संचालक तथा ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक भाई परमेकर यांनी विद्यार्थ्यांना केले.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाई परमेकर. सोबत उद्योजक विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत,राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, तेजस देसाई.

ते महाविद्यालयाच्या वर्धापनदिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची ज्ञानगंगा येथे आणण्याचे कार्य संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये व त्यांचे सहकारी यांनी केले आहे. २००१ साली स्थापन झालेले हे महाविद्यालय अत्यंत खडतर वाटचालीतून पुढे आले आहे. महाविद्यालयाचा वर्धापनदिन साजरा होत असताना त्यांनी महाविद्यालयाची वाटचाल अत्यंत प्रतिकूल परीस्थितीत कशी झाली याचा आढावा त्यांनी घेत आपला अनुभव व्यक्त केला. यावेळी महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य तथा निवृत्त प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर यांनी तयार केलेल्या टीचिंग एड्स कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी डॉ. पेडणेकर यांनी दोडामार्ग तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळांना हे साहित्य मोफत देण्याचे आश्वासन दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की , प्रत्येक ठिकाणीआज नोकरीसाठी पदवीपर्यंत शिक्षण ही किमान पात्रता असून त्यासाठी प्रत्येकाने महाविद्यालयीन शिक्षण घेतलेच पाहिजे. यावेळी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते लक्ष्मीबाई सीताराम हळबे यांच्या जीवनपटावर तयार केलेल्या फ्लेक्स चे अनावरणही करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सुरंगी या वार्षिक अंकाचे तसेच नवदर्पण वार्तापत्राचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, तेजस देसाई, पत्रकार भूषण सावंत, समीर ठाकूर आदि उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. रामकिसन यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. संजय खडपकर यांनी मानले.